जा.क्र./आस्था/ ११८९ /२०२५
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
दिनांक : २५ / ०७ /२०२५

# कार्यालयीन आदेश

**विषय:-** कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसंबंधीचे कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी कागदपत्र सादर करणेस मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :-** **१)** जा.क्र./आस्था/२३३/२०२५ दिनांक २४/०४/२०२५ रोजीचे परिपत्रक.
**२)** जा.क्र./आस्था/२९२/२०२५ दिनांक ३०/०४/२०२५ रोजीचा कार्यालयीन आदेश.
**३)** जा.क्र./आस्था/५८६/२०२५ दिनांक २९/०५/२०२५ रोजीचा कार्यालयीन आदेश.
**४)** जा.क्र./आस्था/८४९/ दिनांक २३/०६/२०२५.
**५)** जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय सफाई मजदूर संघ यांचे दिनांक १४/०७/२०२५रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसंबंधी दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त व या प्रकरणी टिपणी,आदेश,परिपत्रक, प्रपत्र, गोषवारा संदर्भ क्र. २ च्या कार्यालयीन आदेशान्वये अवलोकनार्थ जळगांव शहर महानगरपालिकेच्या www.jcmc.in.net संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. १ चे परिपत्रकान्वये कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी यांना कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणे कामी त्यांच्या वैयक्तिक सेवा तपशीलाची आवश्यक कागदपत्रे संबंधित कार्यासन लिपीकाकडे दिनांक १५ जुलै २०२५ पर्यंत जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

तथापि अखिल भारतीय सफाई मजदूर संघाचे पत्रानुसार बऱ्याच सफाई कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र काढेणसाठी वेळ लागत असल्याने काही कर्मचाऱ्यांनी सदर मुदत वाढवून देणेबाबत मागणी केल्याने वैयक्तिक सेवा तपशीलाची / कागदपत्राची पूर्तता करणेकामी दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(धनश्री शिंदे)
**उपायुक्त**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**
१) सर्व विभाग प्रमुख,म.न.पा. जळगांव.
२) सर्व कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी,म.न.पा.जळगांव.
३) आस्थापना अधिक्षक,म.न.पा.जळगांव.
४) सर्व कार्यासन लिपीक, आस्थापना विभाग,म.न.पा.जळगांव.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त,म.न.पा.जळगांव.
२) मा. मुख्य लेखा परिक्षक,म.न.पा.जळगांव.
३) मा. मुख्य लेखाधिकारी,म.न.पा.जळगांव.

E:\EST WINDOWS १०\A आदेश\सर्व विभाग प्रमुख\कालवद्ध पदोन्नती कागदपत्रे सादर करणेवावत २७०२९.docx

Scanned with OKEN Scanner